345

महाराष्ट्र शासन

क्र.एमएसआरएलएम/लेखा/ ८७६ /२०२५
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास विभाग,
पाचवा मजला, सिडको बिल्डींग,
(साऊथ विंग), कोकण भवन,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दि. २१ /०३ /२०२५

प्रति,
जिल्हा अभियान संचालक,
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व जिल्हे

**निधी वितरण आदेश क्र. १२५२**

**विषय -: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान इंटेनसिव्ह (NRLM - Intensive) जिल्हयांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता निधी (Fund Limit) मर्यादा उपलब्ध करुन देणेबाबत**

महाराष्ट्र राज्यात सन २०११ पासून राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही योजना राबविण्यास सुरुवात झालेली आहे. केंद्र शासनाव्दारे सर्व केंद्र अनुदानित योजना (Centrally Sponsored Schemes) यांचे निधीचे प्रभावी व्यवस्थापन होण्यासाठी तसेच सार्वजनिक खर्चाचे उत्तम व्यवस्थापन होण्याच्या दृष्टीने राज्यात प्रत्येक केंद्र अनुदानित योजना (Centrally Sponsored Schemes) चे Single Nodal Agency (SNA) या पध्दतीची दि. ०१/०७/२०२१ रोजी पासुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने सदर योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) कार्यप्रणाली लागु करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाचे पत्र क्र.No-G-२०११/०२/२०१९ RL(e-३६६७२०) दि.०६.०९.२०२२ मधील मार्गदर्शक सूचना प्रमाणे NRLM, NRETP, MKSP व SVEP या केंद्रपुरस्कृत योजनांसाठी Electronic Fund Management Cum Accounting Solution (e-FMAS) ही कार्यप्रणाली सन २०२३-२४ पासून लागू करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हयाला यानंतर निधी वितरीत न करता निधीची मर्यादा (Fund Limit) e-FMAS कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय नियंत्रण समिती तसेच राज्यस्तरीय सर्वसाधारण समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) योजनेचा निधी वितरीत करण्यात येत आहे. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, अहमदनगर अकोला, अमरावती, छत्रपती संभाजी नगर, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदीया, हिंगोली, जालना, जळगाव, कोल्हापूर, लातुर, नागपुर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, धाराशिव, पालघर, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम, यवतमाळ जिल्हयांकरीता वित्तीय वर्ष २०२४-२५करीता, खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे जिल्हयांना **लेखाशिर्ष B अंतर्गत मंजूर वार्षिक कृती आराखडा २०२४-२५ च्या १००% निधी मर्यादा (Fund Limit)** निधी मर्यादा देण्यात येत आहे.

**जिल्हानिहाय e- FMAS कार्यप्रणालीमध्ये प्रस्तावित निधीची मर्यादा (Fund Limit)**

(रु. लाखात)

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | या आदेशाव्दारे वितरीत करावयाचे निधी मर्यादा (Fund Limit) | निधी मर्यादा उपलब्ध करुन देण्यात आलेले लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १ | अहिल्यानगर | १३९१.२४ | Component B |
| २ | अकोला | ६०७.३५ | |
| ३ | अमरावती | ७६१.४० | |
| ४ | बीड | ४८३.०५ | |
| ५ | भंडारा | ६८१.०१ | |
| ६ | बुलढाणा | ८०२.७० | |
| ७ | चंद्रपुर | ५७४.६१ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | छत्रपती संभाजीनगर | ११०२.१५ | |
| ९ | धाराशिव | ३९२.४८ | |
| १० | धुळे | ८०५.४८ | |
| ११ | गडचिरोली | ४५६.४२ | |
| १२ | गोंदीया | ४२५.०५ | |
| १३ | हिंगोली | ५२९.६६ | |
| १४ | जालना | ४४०.०० | |
| १५ | जळगाव | ३१२.३७ | |
| १६ | कोल्हापुर | १३४६.५४ | |
| १७ | लातुर | ७०१.५२ | |
| १८ | नागपुर | ९२८.५१ | **Component B** |
| १९ | नांदेड | ८९१.७१ | |
| २० | नंदुरबार | ४८७.१८ | |
| २१ | नाशिक | १२९२.५९ | |
| २२ | पालघर | ४०४.१२ | |
| २३ | परभणी | ६८०.९५ | |
| २४ | पुणे | १४६८.२९ | |
| २५ | रायगड | ८८३.९७ | |
| २६ | रत्नागिरी | ४२६.८० | |
| २७ | सांगली | ७९७.३१ | |
| २८ | सातारा | ९१५.१९ | |
| २९ | सिंधुदुर्ग | ३००.०० | |
| ३० | सोलापुर | ४९०.९१ | |
| ३१ | ठाणे | ३८०.७४ | |
| ३२ | वर्धा | ४६४.६८ | |
| ३३ | वाशिम | ५७५.४४ | |
| ३४ | यवतमाळ | ६७४.२३ | |
| | **एकूण** | **२३८७५.६५** | |

**खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून खर्च करण्यात यावा.**

अटी व शर्ती

१. सदर कार्यक्रमातील कामे सूरु करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घ्यावी.

२. सदर अनुदान राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ च्या मंजुर वार्षिक कृती आराखडयानुसार वितरीत करण्यात येत असून लेखाशिर्ष व उपलेखाशिर्षनिहाय आपल्या जिल्हयाच्या भौतिक व आर्थिक लक्षांकानुसार मंजूर तरतूदीच्या मर्यादेत खर्च करावा.

३. निधी प्राप्त होताच त्वरीत सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे माहे फेब्रुवारी २०२५ पर्यतचे वेतन व भत्ते, **TA & DA** प्रामुख्याने अदा करण्यात यावे.

४. सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधन अदा करताना दुबार अदायगी होणार नाही, तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणेच मानधन अदायगी होईल याची काळजी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी घ्यावी.

५. निधी मर्यादा प्राप्त होताच त्वरीत निधी खर्च होईल याचे नियोजन प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी करावे.

६. प्राप्त अनुदानामधुन झालेल्या खर्चाची स्वाक्षांकित माहिती या कार्यालयास पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत सादर करावी तसेच सदर माहिती / finance@umed.in या ई-मेल आयडी वर देखील पाठविण्यात यावी.

७. प्राप्त निधीसाठी जमा / खर्चाचे द्वीनोंदी लेखा पध्दती (**Double Entry System**) मध्ये स्वतंत्र लेखे ठेवावेत.

८. सदर खर्चाचे महालेखापाल / सनदी लेखापाल तसेच अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडून लेखापरीक्षण करण्यात येणार आहे त्याअनुषंगाने आवश्यक लेखे अद्यायावत ठेवावेत.

९. देयकांमधील करविषयक तसेच संविधानिक वजातीच्या रक्कमांचा भरणा करणेबाबत देयकनिहाय वजातीच्या रक्कमांचा तपशिल आपले स्तरावर जतन करुन ठेवण्यात यावा व योग्य प्राधिकरणाकडे विहित मुदतीत नियमित भरणा करण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक यांची राहील.

१०. केंद्र शासनाचे पत्र क्र.No-G-२०११/०२/२०१९ RL(e-३६६७२०) दि.०६.०९.२०२२ मधील मार्गदर्शक सूचना प्रमाणे NRLM, NRETP, MKSP व SVEP या केंद्रपुरस्कृत योजनांसाठी Electronic Fund Management Cum Accounting Solution (e-FMAS) ही कार्यप्रणाली सन २०२३-२४ पासून लागू करण्यात आलेली आहे.

११. NRLM या योजनेसाठी यापुढे जिल्हयाला e-FMAS या कार्यप्रणालीचा वापर करणे बंधनकारक राहील. e-FMAS संदर्भात दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांची तंतोतंत पालन जिल्हास्तरावर करण्यात यावे.

१२. जिल्हयांना e-FMAS कार्यप्रणालीमध्ये सर्व प्रकारचे Payment DSC च्या माध्यमातून करणे बंधनकारक राहील.

१३. जिल्हयांना e-FMAS प्रणालीमध्ये DSC -१(Accounts Officer), DSC -२(District Mission Manager), DSC -३(Project Director), DSC -४(Chief Executive Officers) चा वापर करताना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वित्तीय अधिकाराची तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

प्रत -:

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त सर्व यांना माहितीस्तव.
३. उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४. अवर सचिव, योजना ३, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५. उपआयुक्त विकास, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना कार्यवाहीस्तव व माहितीस्तव.
६. जिल्हा अभियान सहसंचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व जिल्हे यांना कार्यवाहीस्तव.
७. जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सर्व जिल्हे यांना कार्यवाहीस्तव.
८. लेखाधिकारी, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सर्व जिल्हे यांना कार्यवाहीस्तव.
९. जिल्हा व्यवस्थापक, सर्व जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सर्व जिल्हे यांना कार्यवाहीस्तव.